**भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.३४६/२०१३ मधील**

**निशाणी क्रमांक १७ खालील आदेश**

**(CNR No.MHWS050001982012 )**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांच्यातर्फे दिनांक ४.१२.२०२४ रोजीचे वारस प्रमाणपत्र, वारसाचा दाखला आणि पाच आधार कार्डाच्या छायांकीत प्रती अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. अर्जदार यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.भिंगारे आणि गैरअर्जदार क्र. १ यांच्यातर्फे सहा.सरकारी वकील यांचा आणि गैरअर्जदार यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. बी.एम.ठाकरे यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार दाखल करु इच्छित असलेल्या दिनांक ४.१२.२०२४ रोजीचे वारस प्रमाणपत्र, वारसाचा दाखला आणि पाच आधार कार्डाच्या छायांकीत प्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय ? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u> :-**

३. अर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा रेफरंन्स अर्जदाराने भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ अन्वये दाखल असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. परंतू मुळ अर्जदार मोहन आडे हे दिनांक २५.११.२०१६ रोजी मयत झाले आहेत, त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब माफीचा अर्ज निशाणी क्र. १४ आणि वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज निशाणी क्र. १५ या दोन अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार हे दिनांक ४.१२.२०२४ रोजीचे वारस प्रमाणपत्र, वारसाचा दाखला आणि पाच आधार कार्डाच्या छायांकीत प्रती दाखल करीत आहेत. तरी, त्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट गैरअर्जदार क्र. १ व २ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, संबंधीत कागदपत्रे दाखल करण्यास अर्जदाराने खूप विलंब केलेला आहे. तरी, अर्जदारांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा रेफरंन्स अर्जदाराने भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ अन्वये दाखल असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. परंतू मुळ अर्जदार मोहन आडे हे दिनांक २५.११.२०१६ रोजी मयत झाले आहेत, त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब माफीचा अर्ज निशाणी क्र. १४ आणि वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज निशाणी क्र. १५ या दोन अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार हे दिनांक ४.१२.२०२४ रोजीचे वारस प्रमाणपत्र, वारसाचा दाखला आणि पाच आधार कार्डाच्या छायांकीत प्रती दाखल करीत आहेत. दिवाणी न्यायाधीश क.स्तर मानोरा यांनी दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५०/२०२४ मधील दिनांक २८.११.२०२४ रोजीच्या आदेशानुसार दिनांक ४.१२.२०२४ रोजी दिलेल्या वारस प्रमाणपत्रानुसार मोहन महादू आडे हे दिनांक २५.११.२०१६ रोजी मयत झाले आहे, त्यांना शांतीबाई, तुकाराम, चंगोलाबाई, संगीता आणि दिनेश असे पाच वारस आहेत. त्यामुळे ती कागदपत्रे अभिलेखावर आली तर अर्ज निशाणी क्र. १४ व १५ गुणदोषावर निकाली काढण्यास उपयुक्त ठरु शकतात त्यामुळे ते अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि अर्जदार यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.१७ हा मंजुर करण्यात येत आहे आणि अर्जदार यांना उपरोक्त कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.10.04 13:48:59 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : ४.१०.२०२५

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, मंगरुळपीर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 4.10.2025 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 4.10.2025 |
| 5) | Order uploaded on | :- 4.10.2025 |